# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-4** **Issue - 5** नोव्हेंबर - २०११ **November 2011**


## संपादकीय

**प्रिय सभासद मित्रांनो,**

'संध्या-छाया भिवविती हृदया' अशी एक ओळ राजकवी भा.रा.तांबे यांच्या 'जन पळभर म्हणतील हाय हाय' ह्या अत्यंत सुंदर कवितेत आहे.

पण जीवनात संध्या-छाया येत असताना भिण्यासारखे काय आहे? बालपण, तारुण्य आणि वृद्धत्व हे सृष्टीनियमानुसार येणारे चक्र आहे. ते चक्र आपण पूर्ण करणार आहोत; म्हणून आपल्याला समाधान वाटले पाहिजे.

''मृत्यूची भीती कायमची आणि
जगण्याची आशाही कायमची''

अशा स्थितीला आपण येऊन बसलो आहोत, आपण सर्व सहकारी आता निवृत्त होवून, उतार वयात प्रवेश केलेला आहे. अशा वेळी आपण आपल्या गत-जीवनाकडे डोकावून पाहताना आपणास काय दिसते? आपले जीवन कसे आणि कोणी घडविले?

बालपणी गुरुजनांनी विद्या शिकविली, घरातील वडिलधाऱ्या मंडळींनी संस्कार केले. भोवतालच्या परिस्थितीने आपणास घडविले. भाषाविषयक जाण आल्यावर साहित्यिक मंडळींनी त्यांच्या विविधांगी लेखनाने आपल्या मनाचा ताबा घेतला. आपली बौद्धिक भूक काव्य, कथा, नाटके, कादंबऱ्या यांनी भागविली व नकळत आपण घडत गेलो.

कलाविषयक रसास्वाद घेताना गाणं, संगीत, वाद्यवादन ह्या क्षेत्रात प्रवेश केल्यावर आपण किती आनंद गोळा केला ह्याचा अंदाजही करता येणार नाही. त्यासाठी साधनं तरी किती प्राप्त झाली. रेडिओ, सिनेमा, संगीत नाटकं, संगीत समारोह, मैफिली, नंतरच्या काळात उपलब्ध झालेले साहित्य म्हणजे कॅसेटस्, सीडी, डि.व्ही.डी., इंटरनेट, टि.व्ही. अबब! ज्यांना क्रीडाविषयक आवड आहे. त्यांच्यासाठी घरी बसल्या बसल्या सर्व स्पर्धा, सामने टि.व्ही. वर उपलब्ध झालेले आहे.

जीवनात भोगलेल्या दु:खांची, अडचणींची, अभावांची पूर्तता ही साहित्यिक, कलावंत व क्रिडापटू मंडळी करीत असतात. आपल्या जीवनात आनंद फुलवितात. आपल्याला जगण्यासाठी बळ पुरवितात आणि सुख दु:खाच्या जगापलिकडे आपल्याला नेऊन सोडतात. आहे त्या परिस्थितीत समाधानाने कसे जगावे हे सांगतात.

सुदैवाने आपणास मराठी साहित्य वाचावयास मिळाले. सिनेमा व रेडिओच्या माध्यमातून संगीताचा आस्वाद घेता आला. काव्यानंदात मग्न होता आले. मित्रही तसेच मिळत गेले. जीवन संध्या अत्यंत तृप्त अवस्थेत व्यतीत करता आली व येत आहे. अशा या सुखाची तुलना कशाशीही करता येणार नाही.

मृत्यूबद्दल जास्त विचार करणे व्यर्थ आहे. हाती असलेला क्षण कसा चांगला जगता येईल हा विचार महत्त्वाचा.

मराठी गझलकार मनोहर रणपिसे ह्यांचा मृत्युबद्दल एक उत्तम शेर तो असा -

*''आयुष्याचे खटले सारे, मृत्यूने निघतात निकाली*
*सुनावणी तर होतच नाही, रोज फक्त पडतात तारखा''*

यासाठी आता सतत कार्यरत, कार्यमग्न राहून उर्वरित आयुष्य सुखात व्यतीत करणे एवढेच आपल्या हाती आहे. समाधानी वृत्ती ठेवण्याबाबत गीतकार शैलेंद्र म्हणतो -

*''बहुत दिया देनेवाले ने तुझको*
*आंचल ही न समाये तो क्या कीजे*
*बीत गये जैसे ये दिन-रैना*
*बाकी भी कट जाये दुआ कीजे ।।*


- **वसंत धुपकर**, पुणे
भ्रमणध्वनी - ९८९०८७०२१८

## Supreme Court of India

**Writ Petition (Civil) No.184 of 2011**

As informed in 'Samvad' issue of September 2011 the above Petition was called on for hearing on 2nd November 2011. In this connection our Federation has advised further developments vide its Circular Letter No.87 dated 8th November 2011 as under. The two Respondents viz. Government and Reserve Bank of India were not present and have not submitted their reply. The request made by the Advocate of our Bank to grant two more week's time for furnishing his reply was rejected by the Registrar. The Registrar has ordered the posting of our petition before the Court as per the rules. While passing the order, the court said :

**"Since sufficient time has been granted to the respondents for filing counter affidavit, no further time can be granted by this court for the same. List before the Hon'ble Court, as per rules." - Registrar**

No further date has been fixed for hearing. We will inform the members further developments in due course. Members may visit our web-site periodically to know the further developments. We always keep our web-site updated for latest information, if any.

**- Secretary**

## युनीट वार्ता -

आपल्या अहमदनगर युनीटने दि.२५ सप्टेंबर २०११ रोजी नगर येथील ज्येष्ठ सदस्य श्री.डी.बी.जोशी यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली म्हणून त्यांचा युनीटच्यावतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार केला. असोसिएशनच्यावतीने श्री.डी.बी.जोशी यांचे अभिष्टचिंतन व शुभेच्छा.

- शि.रा.जोशी, युनीट सेक्रेटरी

## Attention Members

**Have you given *Life Certificate* to your Pension-paying Br.? If not, please expedite submission to avoid Non-Credit of your Pension w.e.f. January 2012**

Kindly refer Bank's e-Circular No. CDO/P&HRD-PPFG/29/2011012 dt.3-06-2011 reproduced on page No.10 of October 2011 issue of SAMVAD

**Please also submit copy of your PANCARD**

## सर्व सभासदांसाठी

**आपण आपल्या ब्रँचला लाईफ सर्टिफिकेट दिले का? नसल्यास त्वरित बँकेत जाऊन लाईफ सर्टिफिकेटवर सही करून द्यावे.**

**अन्यथा जानेवारी २०१२ पासून पेन्शन खात्यावर पेन्शन जमा होणार नाही याची नोंद घ्यावी.**

## अभिनंदन

आपल्या सांगली युनीटचे एक ज्येष्ठ सभासद श्री.दीनानाथ भावसार यांच्या पत्नि सौ.मनोरमा भावसार यांचा क्रीडाभारती, सांगली यांचेकडून 'वीरमाता जिजाऊ' पुरस्कार देऊन ३ सप्टेंबर २०११ रोजी गौरव करण्यात आला. त्याबद्दल सौ.भावसार यांचे असोसिएशनतर्फे हार्दीक अभिनंदन !

तसेच आपले सभासद श्री.मोहन वामन देशपांडे यांची सांगली येथे जानेवारी २०१२ मध्ये होणाऱ्या ९२व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या मुख्य नियोजन समितीवर सहकार्यवाह म्हणून निवड झाली आहे त्याबद्दल श्री.मोहन देशपांडे यांचे असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील नियोजित नाट्य संमेलनास शुभेच्छा !

- सेक्रेटरी

# S.B.I. Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

## Association's Office-cum-Holiday Home at Panaji (Goa)

On the occasion of 12th Annual General Meeting of our Panaji Zonal Sub-Centre on 28th March 2010 our Association's Office-cum-Holiday Home was inaugurated at the hands of S/ShriV.M.Gokhale, President of the Circle Association and B.G.Dandekar, Advisor to the Federation, in the presence of Circle Managing Committee members from Mumbai, Pune and Panaji Zonal Sub-Centre. The premises are being used by our Panaji ZSC for conducting periodical meetings of Zonal Managing Committee. The rooms have been provided with good amenities and are being used by our members as Holiday Home for those who visited Goa with family so far with prior booking. Our Panaji Zonal Sub-Centre's office bearers Shri.P.M.Narkar, President; Shri.I.H.Dias, Secretary and Shri.Gopinathan, Treasurer, are managing the affairs of the Holiday Home.

As the members know that we are charging Rent of Rs.300/- per room with two beds per day (means Rs.150/- per Bed per day). The occupancy during the last year up to 30-09-2011 was satisfactory. The rent recovered during the period was more than sufficient to take care of expenses incurred for maintenance of the rooms on regular basis including yearly House Tax paid to the local Municipal Corporation and the maintenance charges paid to the Madhuban Coop Hsg society where these premises are located. We have kept a Book at Holiday Home to record suggestions/complaints for those who occupy the rooms.The suggestions are being taken care of by the Panaji ZSC and the amenities suggested by occupants are being provided for the benefit of future occupants. Our endeavour is that our members' requirements as regards Holiday Home at Panaji should be taken care of as far as possible and their stay should be comfortable. Some of the suggestions/complaints made by our members who occupied the rooms during the past are reproduced hereunder.

1) Mrs.Kshama M.Arsekar, Nagpur - "Hospitality shown by Shri.Dias is excellent. Freeze is absolutely necessary. Few more plates and spoons should be provided. Very nice and comfortable stay."
2) Mr.Shrikant G.Desai, Nagpur - "Plastic stool for taking bath may be provided in bath room; Although cooking is prohibited, one Hot Plate be provided for boiling milk etc.; Wires may be provided for drying wet clothes; services of a sweeper should be engaged for maintaining cleanliness; Hospitality and other arrangements are excellent."
3) Mr.S.B.Gokhale, Mumbai - "Please provide six stainless steel mugs and cups for drinking tea. Hospitality is excellent."
4) Mr.M.B.Joshi, Mumbai - "Two stools and a wall clock suggested by Shri.S.G.Desai have been donated by S/Shri.S.B.Gokhale and M.B.Joshi. Maintenance is excellent."
5) Mr.P.S.Lawate, Nashik - "Due to water shortage and provision for the same, we could not take bath and our visit to Goa temples was to be cancelled. Plastic drums should be provided for storing water to avoid above situation. We are donating Rs.501/- for the purchase of two plastic drums. In the evening the plastic drums were purchased and provided immediately. Thanks for prompt action."
6) Mr.S.V.Kelkar, Pune - "I repeat what I wrote in my letter dt.9-07-2010 to the Association that starting a Holiday Home by small Zonal Sub-centre like Goa under the able leadership of S/Shri.P.M.Narkar and I.H.dias is in itself an adventure and that other ZSCs should follow them. (In fact this facility has been provided by our Circle Association at Panaji) The location is quiet and the Society complex is peaceful. And that is the thing exactly required by our tribe in the present days. I offer my best wishes to the ZSC, Goa, Shri.Narkar and Shri.Dias who personally look after the comforts of the occupants."

7) Mr.S.R.Joshi, Ahmednagar - "Nice stay at Panaji. Mr.Dias is very helpful and cooperative person. Thanks to whole Goa unit. One T.V. set as well as flask may be provided at Guest House."

The above suggestions have been taken care of except TV and Freeze which will be considered in due course.

Our Panaji ZSC has suggested that pensioners who desire to take benefit of our Holiday Home, they should communicate the following details as far as possible by a letter:-

Name of the Pensioner Member, Landline and Mobile Phone Numbers, Date & Time of arrival at Panaji, Plan of Departure, Mode of Travel to Goa, Number of Beds required and are requested to remit in advance 1 day's rent by crossed cheque/ Demand draft fvg.'S.B.I.Pensioners' Association, Panaji'

Cancellation of bookings for whatever valid reasons should be communicated to us so that other colleagues get the accommodation chance.

For bookings etc. please contact : Shri.P.M.Narkar - (M) 09822104076; or
Shri.I.H.Dias - (M) 08698214924.

The Address of the Holiday Home is reproduced hereunder :

F/5, Madhuban Complex Coop Hsg Society, Tambadi Mati, Santa Inez, Panaji, Goa - 403001.

Members are requested to note the above and take benefit of our Holiday Home.

**- Secretary**

*******************************************************************************

## जगताचे रूप

जगताचे ह्या रूप वेगळे, सदा कसे आगळे
पैलू पैलू बदलत जाई, दिसती निरनिराळे....
जसे पहावे तसेच दिसते, रूप बदलुनी
मनामधल्या कल्लोळाचा, मार्ग दृष्टीमधुनी
जणू मने ही मूर्त जाहली, विचारबंधांमुळे
जगताचा ह्या रंग कसा रे, भावनांचा तसा
आविष्कारही एक रसाचा, मनात प्रबळ जसा
त्या रसाचे आस्वादही ते, असती किती रसीले
जगताचा ह्या सूर कसा मग, जसा उमटतो मनीं
हृदयवीणेची तार छेडिता, उमटतो जो ध्वनी
त्या ध्वनीने कर्ण मनाचे, तृप्त कसे जाहले
जगताचा ह्या गंध कसा बघ, फूल फुलावे तसा
सुखदु:खाच्या वाऱ्यावरती, आरूढ होई जसा
त्या लहरींनी अंतराला, झोके कितीक दिले
या जगताच्या दर्पणात हो, प्रतिबिंब स्वत्वाचे
जणू शिखराच्या माथ्यावरूनी, प्रतिध्वनी सादाचे
पडसादातूनी वैचारिक हे, तरंग कैसे उठले

**- सौ.उज्ज्वल र. ब्रह्मांडकर,**
विरार, ठाणे

## घार हिंडते आकाशी

तुझे उड्डाण थरार, तुझा आकाशी संचार
परी लक्ष धरतीवर - कशासाठी? ।।१।।
मध्यांनी उन्हाशी, चित्त तुझे पिल्लापाशी
थकशी दिसामाजी कशासाठी? ।।२।।
दिसशी उंचीवर छोटी तरी झेप तुझी मोठी
येशी क्षणात जमिनीवर कशासाठी? ।।३।।
तुझी अभेद्य नजर, करिशी भक्षाला बेजार
उमजे व्याप उड्डाणाचा कशासाठी? ।।४।।
बळ देवाने ग दिले, पडे क्षितीज अपुरे
माणसाला तूच सांग कशासाठी? पोटासाठी ।।५।।

**- प्रभाकर वासुदेव कानिटकर,**
कोल्हापूर, भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## अभिनंदनीय

आपले कोल्हापूर येथील एक सभासद श्री. प्रभाकर कानिटकर यांची नात चि. जान्हवी हीस राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद मिळाले. ज्येष्ठ बॅडमिंटनपटू श्री. प्रदिप गंधे यांचे हस्ते पारितोषिक देऊन तिला गौरवण्यात आले. सदर खेळास तिचे वडील श्री. मंदार कानिटकर यांचे मार्गदर्शन लाभले होते.

चि. जान्हवीचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन!

- सेक्रेटरी



## GURUDEV: THE JEWEL OF INDIA

"Gurudev" is synonymous with Ravindranath Tagore. Born in a wealthy family of Thakurs to Devendranath and mother Sharadadevi on 7th May, 1861 he was the last and 13th surviving child.

He attended many schools but he did not like the conventional education system and he preferred to study at home after his mother's death in 1875. He was taught Biographies, history, astronomy, modern Sciences, Physics, Mathematics, Bangla literature, Sanskrit, Music, Art etc. including wrestling and Gymnastic. There used to be discussions on literature and religion in the house as all family members were well educated.

Little Rabi, as he was affectionately called, did not have liberty to go out alone and he was under care of servants in the house. Was he a lonely soul in the house? That's the question a lay man would ask. No. He was alone but not lonely. He would sit near a window and gaze at the outside world. He was astonished by view of sky and unknown world outside his place and felt that they are all a mystery.

He was given the responsibility of looking after family estate when he was about 25 years old. He then lived in utmost seclusion in the solitude of an obscure Bengal village by the river Ganges in a boat house. "The wild ducks which came during the time of autumn from Himalayan lakes were my only living companions, and in that solitude I seem to have drunk in the open space like wine overflowing with sunshine, and the murmur of the river used to speak to me and tell me the secrets of nature". He said in his speech while accepting Nobel Prize.

He also revealed in his speech the secret as to why and how he became a teacher. He felt that since he had deep love for nature he also has love for children. "My object in starting this institution (Shantiniketan) was to give the children of men full freedom of joy, of life and of communion with nature. I myself had suffered when I was young through impediments which were inflicted upon most boys while they attended school and I have had to go through the machine of education which crushes the joy and freedom of life for which children have such insatiable thirst. And my object was to give freedom and joy to children of men". He said while explaining the objective of Shantiniketan.

Gurudev enjoyed teaching under the sky and under trees, participating in festivities and his students also enjoyed freedom. He faced financial crunch in running the school as also serious calamities in personal life. His wife who was looking after the students like her own children sold off her own ornaments to ease the problem. She died in 1902. Her death followed death of his daughter, his father and his son in a short span of 5 years. He buried his grieves under his heart and concentrated all his faculties on serving the Shantiniketan and the village. I find a strange coincidence here. Devendranath wanted a quiet and serene place for his meditation. He found a barren and arid place where there were only two trees. He converted this barren land into 'Shantiniketan' by planting trees. Gurudev transformed tender and loving hearts of young students to make them beautiful human beings. Surely, this must have been abode of Mother Saraswati.

Literature, music, art, photography are some of the media for a person to expresses his own emotions and sentiments. Gurudev achieved proficiency in first three media. Photography was still not a powerful medium then. Otherwise we would have certainly seen best of photographs from him. Besides being a great teacher and poet he was also a Philosopher, musician, writer and educationist. He wrote and composed over 2000 songs. His style became famous as Rabindrasangit and is sung in all the Bangla speaking families, even by the illiterate villagers. He started painting at the age of 60 and held his debut exhibition in Paris and then throughout Europe.

He was a staunch nationalist and a social reformer. He wrote poem, Amar Sonar Bangla, as protest for partition of Bengal on communal line by Lord Curzon in 1905. (In 1971, Bangladesh made

it their national anthem.) He was conferred Knighthood by the then British Government in 1915 but he renounced it in 1919 as protest against Jalianwalla massacre of innocents. He was against untouchability and lectured against the caste system. He portrayed dalits as heroes in poems and dramas and stories. He successfully campaigned for dalits' entry in Guruvayur temple which was forbidden till then. Shivaji Utsav written in 1896 was inspired by Lokmanya Tilak. I understand from knowledgeable sources that he practically expressed anguish in the poem as no Bengali ever gave coverage to this great king from Maharashtra.

He travelled to 30 countries covering 5 continents during 1878 to 1932 to enlighten the world at large about his dreams. During one such visit to America in 1921 he met agricultural economist Mr. Leonard Elmhurst, a British national and invited him to come to India to start 'Institute of Rural Reconstruction'. The institute was later named SHRINIKETAN.

He was a creative genius and quite knowledgeable of Western culture especially Western poetry and science. He had a good grasp of modern -post Newton- Physics. His meeting and tape recorded conversation with his contemporaries such as Albert Einstein and H.G. Wells, epitomize his brilliance. His urge to spread knowledge and his down to earth approach for literature, science, fine arts impressed Mahatma Gandhi so much that he addressed him GURUDEV.

Old Sanskrit verse "vidwan sarvatra pujyate" is aptly fits him. His poetry and his work in educational field have been appreciated greatly all over the world. He was awarded Nobel Prize in literature in 1913 for his collection of poetry 'Gitanjali, (originally written in Bangla but was translated in English). Oxford University conferred upon him the honorary degree of Doctor Of Literature (D. Lit.) in 1940 by arranging special ceremony at Shantiniketan. He is the only poet who has given national anthem to two countries e.g. India and Bangladesh.

His sense of humanity and his humble nature are amply reflected in his address, he delivered in Stockholm on 26th May 1921 while accepting the Noble Prize. 'I know that I must not accept that praise as my individual share. It is the East in me which gave to the West.' He had then said.

Gurudev dedicated the prize money to the university. He desired that Western students to come to Vishvabharati and work together with Eastern brethren in pursuit of truth and try to find the treasures hidden in the East for centuries. While talking about spirit of India he said: "I do not think that it is the spirit of India to reject anything, reject any race, and reject any culture. The spirit of India has always proclaimed the ideal of unity. To comprehend all things with sympathy and love is the spirit of India." At the end of his speech he appealed to the gathering and invited them to come to the university to make this university a common institution for the East and the West and give contributions of their lives to make it living and representative of the undivided Humanity of the world.

Gurudev lost his consciousness for a short while in 1937. This did not come in the way of his creativity. In fact his will power was so strong that his poetry from this period is said to be finest.

He took his last breath on 7th August 1941 at Jarasanko Mansion, his birth place. He is true jewel of India and he is still shining through his literature, Rabindrasangit, art and through the institutions he created for benefit of next generations. Let us bow down to him crores of times on his 150th birth anniversary year.

- ***Y.V.Deshmukh***, Mobile No. 9322061054.

(Note: - I have collected information from: 1. Internet. 2. Ravindranth, Shantiniketan- Shriniketan Parichay (Hindi) published by B.B.Publication, Shantiniketan and 3.Great Works of Rabindranath Tagore, published by Jainco Publishers, Delhi).

I have taken adequate precaution for data accuracy. Any inadvertent discrepancy may please be excused.

## You Can Be A Winner

"Visit our web site & be a proud winner of a gift. Absolutely free". "Use your credit /debit card and win additional reward points". We come across various novel advertising and marketing ideas. Essentially these are incentives for people to use their product or services.

Just think of it. Can we not apply this concept of winning points in our real life? Life offers us so many chances to win points but they go unseen & unheard as we are simply unaware of their persistent calls.

First of all we have to become aware of our emotions in a given situation & learn to put a break to them before we become their slave or give in to them. For instance one of your close friend has offended you or let you down, you are very deeply hurt & want to just say something nasty to her or him. At that particular moment you eat your words & maintain your cool & keep smiling. Yes at this point you have earned your points. You feel a sense of joy deep within you that you have saved the relationship from breaking.

As you start earning your points consciously, you start enjoying the game & look forward to more challenges as each test empowers you to tap your potential of fortitude

You can add a lighter side to this game by being more innovative in your daily tasks. For instance when you change the style of your cooking or make a few variations in the ingredients you refresh it with a new fragrance of change. Here again you earn a point, as you have added value even to the smallest thing to make your life more interesting. Change is the spice of life & any variation always makes a lot of difference

There are a myriad ways where you can make a difference in your life as well for others.There are so many occasions in your daily life when you can grab a chance to add value to the lives of others around you. Your friend or a colleague at office may need your support when he is fighting for his rights, when you stand by him giving him moral support - lo you have won your point. Or for instance your next door neighbour has not been out of his house for days due to illness, you carry a colourful bouquet & a GET WELL SOON card & try to spend a few moments daily with him just to make him feel wanted & cheerful.The warm smile on his face adds points to your credit balance.

A healing touch a sweet word, giving surprises when least expected by others, all these gestures go a long way to building bridges in all your relationships. These small acts of kindness & love carve a special place for you in their hearts bringing you close to them & to your real self- the real you.

This game unconsciously starts opening so many portals in your mind that you feel connected to others in a manner perhaps you may never have dreamt of. Every point you win adds a new dimension to your thinking & slowly the change is reflected in your personality. Everybody looks up to you in awe as you emanate your rays of sunshine wherever you go.

Now the meaning of life has changed for you. Each day is a new day - you draw a fresh sketch, paint it with colorful events- ever ready to get set & go. This game becomes a play for you, a part of your inner core. Every action & reaction happens spontaneously. Lo! You have won one more point. You seem to have lost count of your points. Now isn't that the greatest reward for you?

Friends if you just inject a little dose of awareness in your daily life you too can be a winner!

- ***Mrs.Manjeeta Deshmukh,*** Tel.-9699376696

# जी.एम.(ओ) की गाडी

माझी बँकेत एकूण ३७ वर्षे सेवा झाली. त्यापैकी चार वर्षे बँकेच्या इन्स्पेक्शन डिपार्टमेंटमध्ये झाली. भारताच्या वेगवेगळ्या भागातील - अगदी उत्तरेकडील हिमाचल प्रदेशापासून ते दक्षिणेकडील केरळपर्यंत - ७२ ब्रँचेसचे इन्स्पेक्शन मला करता आले. हा चार वर्षांचा काळ माझ्या दृष्टीने माझ्या आयुष्यातील सुवर्णकाळ होता असे मी मानतो. कारण भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील, निरनिराळ्या भाषा बोलणारी अनेक माणसे भेटली. त्यांचे स्वभाव, त्यांच्या चाली-रिती, स्थानिक भाषेतील शब्दप्रयोग व त्यामुळे उडालेला गोंधळ वगैरे अनेक गंमती-जमती अनुभवायला मिळाल्या. अनेक ओळखी झाल्या. माझ्या ज्ञानात व अनुभवात भर पडत गेली. म्हणतात ना 'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार,........मनुजा चातुर्य येतसे फार'. त्याच बरोबर मला फोटोग्राफीची आवड असल्याने व माझ्याजवळ जुन्या काळातील PENTAX - K1000 SLR हा चांगला कॅमेरा असल्याने, माझी फोटोग्राफीची आवड जोपासता आली. त्यासाठी माझा सर्व Halting Allowance खर्च झाला. १९८६-९० या काळात बँकेच्या इन्स्पेक्शन डिपार्टमेंटमधील स्केल-३ ऑफिसरला HA Rs.30/- + Rs.5/- Discomfort Allowance असा एकूण रु.35/- दैनिक भत्ता मिळत असे. त्यातच दोन्ही वेळचे जेवण, नाश्ता आणि माझ्या छंदासाठी, म्हणजे फोटोग्राफीसाठी लागणारी फिल्म विकत घेणे, ती धुण्याचा व फोटो प्रिंटस् काढण्याचा वगैरे सर्व खर्च भागवायला लागायचा. बायकोला सुरूवातीलाच सांगितले होते की, मी घरी दरमहा काहीही पैसे पाठवू शकणार नाही, तुला जो माझा पगार खात्यावर जमा होईल त्यातच घरखर्च भागवायला लागेल. त्यामुळे चार वर्षांनंतर-बाकी शून्य. पण या काळातील 'फोटो अल्बम' व अविस्मरणीय आठवणी ही माझी जीवनभराची उत्कृष्ट कमाई मात्र झाली. असो. या काळातील एका गंमतशीर अनुभवाची ही एक सत्यकथा.

उत्तरप्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्ह्यातल्या 'बनत' या ब्रँचची इन्स्पेक्शन आटोपून त्यानंतर 'कर्णप्रयाग' या हिमाचल प्रदेशातील चमोली जिल्ह्यातील ब्रँचचे इन्स्पेक्शनसाठी मी व माझा असिस्टंट निघालो. प्रथम दिल्लीला आलो व तिथून रेल्वेने रात्रभर प्रवास करून सकाळी ६ ।। वाजता 'हरिद्वार' स्टेशनला पोहोचलो. गाडी अर्धातास लेट आली होती. त्यामुळे बसस्टँडची चौकशी करत स्टँडवर येईपर्यंत ७ वाजले होते. चौकशी खिडकीवर कर्णप्रयागला जाणाऱ्या बसची चौकशी केली. तेव्हा खिडकीच्या आतील कर्मचाऱ्याने सांगितले, 'साब, कर्णप्रयागवाली बस अभी-अभी ६ ।। बजे निकल गयी । अभी दूसरी गाडी दोपहरको ३ बजे है।' ही माहिती ऐकल्यावर आम्ही गडबडलो. कारण आम्हाला त्याच दिवशी दुपारी ४ पर्यंत तरी ब्रँचला पोहोचून इन्स्पेक्शन सुरू करणे भाग होते. नाहीतर त्या दिवसाची कॅज्युअल लीव्ह दोघांचीही धरावी लागली असती. आता काय करायचे असे मी असिस्टंटला म्हटले. त्याने पुन्हा खिडकीवर जाऊन इथे टॅक्सी मिळेल का याची चौकशी केली व आम्हाला दुपारी ३ पर्यंत कर्णप्रयागला पोहोचायचे आहे असेही सांगितले. आमची निकड जाणून तो म्हणाला, ''आपको अभी जाना है तो, आपको 'जीएमओ' की गाडीसे जाना पडेगा'' हे ऐकल्यावर मी उडालोच. कारण, मला कळेना की आम्ही इन्स्पेक्शनला कर्णप्रयागला चाललो आहोत हे जी.एम.(ओ) ला कसे कळले? आणि त्याची गाडी नेमकी तिथे उभी आहे हे काउंटरवरच्या माणसाला कसे कळले? कारण तिथे जवळच एक पांढरी ॲम्बॅसेडर कार उभी होती. त्यामुळे आमचा तसा समज झाला. कारण बँकेच्या नियमाप्रमाणे इन्स्पेक्शन प्रोग्रॅम गुप्त ठेवावा लागतो. मी लगेच माझी शंका असिस्टंटला बोलून दाखवली. त्यालाही कळेना हे कसे घडले. मग आम्ही पुन्हा काउंटरवर चौकशी केली की, 'जीएमओ की गाडी कहां है?' तेव्हा तो त्याच्या केबिनमधून बाहेर आला आणि दूरवर बोट दाखवून म्हणाला, 'वो देखो, पीपलके पेडके नीचे जीएमओ की गाडी खडी है, वो अभी ७।। बजे निकलेगी। जल्दी जाओ।'

मग आम्ही धावतच दूरवर पिंपळाच्या झाडाजवळ उभ्या असलेल्या एका खाजगी गाडीजवळ गेलो, तर गाडी पूर्ण भरलेली दिसली. बाहेर तिकिट फाडणारा एक मनुष्य होता, बहुधा कंडक्टर असावा. त्याला विचारले, 'गाडी कहा जानेवाली है?' तो म्हणाला 'कर्णप्रयाग जायेगी, चलो जलदी चढो।' गाडीत जागा नव्हती तरी त्याने आम्हाला सामानासकट गाडीत कोंबले आणि ड्रायव्हरने त्याच्या इशाऱ्यावर गाडी लगेचच चालू केली. कंडक्टरने आम्हाला दोघांना ड्रायव्हर शेजारील इंजिनच्या पत्र्याच्या बॉनेटवर (कव्हरवर) बसवले व तिकिट फाडून पैसे घेतले. पुढे तासाभरात एक बऱ्यापैकी मोठे गाव आल्यावर गाडी थांबली. कांहीं पॅसेंजर उतरल्यावर आम्हाला पुढच्या बाजूसच, पण सीटवर जागा मिळाली. चौकशी केल्यावर कळले गावाचे नांव 'श्रीनगर' आहे. हे काश्मीरमधले नाही तर हिमाचल प्रदेशातील श्रीनगर होते. नाम-साधर्म्यामुळे आपला घोटाळा होण्याची शक्यता असते. अशी, तेच नांव असलेली इतर गावे भारतात बरीच आहेत. असो.

जरा पाय मोकळे करण्यासाठी मी खाली उतरलो व गाडीच्या पुढील वरच्या भागावरील पाटीकडे माझे लक्ष गेले. हिंदीमधे लिहिले होते, 'गढवाल मोटर ओनर्स युनियन' आणि खाली कंसामधे इंग्रजीत त्याचा शॉर्टफॉर्म लिहिला होता - 'GMO संचालित'. आता सगळा उलगडा झाला. जीएमओ म्हणजे 'गढवाल मोटर ओनर्स.' आणि आम्ही समजत होतो बँकेचे GM (O). मग मात्र ही गंमत

आठवून हसू आले. पुढे गाडी चालू झाल्यावर मी असिस्टंटला सहज गमतीने म्हटले आता बहुधा CGM ची सुद्धा गाडी असणार आणि तसेच झाले. दुपारी ३ च्या सुमारास कर्णप्रयागला पोहोचलो. खाली उतरल्यावर जवळच्याच हॉटेलमधे चहा घेतला. व तिथेच अर्धा तास बसून विश्रांती घेतली. नंतर ब्रँच समोरच असल्याने तिकडे जाण्यासाठी म्हणून हॉटेल बाहेर पडलो, तर समोरच एक बस, स्टँडला लागत होती. तिच्या पाटीकडे लक्ष गेले, तो काय, आता मात्र खरोखरच धक्का बसला. कारण पाटीवर वरच्या बाजूला अक्षरें होती, 'CGMO संचालित' आणि खालच्या ओळीवर हिंदीत लिहिले होते - 'चमोली गढवाल मोटर ओनर्स संचालित.' हे वाचल्यावर मात्र आम्हां दोघांची हसून हसून पुरेवाट झाली. ब्रँच समोरच्याच टेकडीसारख्या भागात, इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर होती. ब्रँचमध्ये नेहमीप्रमाणे जाऊन इन्स्पेक्शन सुरू केली. ओळख झाल्यावर ब्रँच मॅनेजरला घडलेली गंमत सांगितली तेव्हा त्यालाही खूप हसू आले व गंमत वाटली. कारण आतापर्यंत त्यांच्यापैकी कुणाच्याही - ही GM / CGM ची गोष्ट लक्षात आली नव्हती.

अशीच स्थानिक भाषेतील वेगळ्या अर्थामुळे झालेल्या फजितीची गोष्ट. मी धौलाकुआँ नावाची हिमाचल प्रदेशातील ब्रँच इन्स्पेक्शन करत होतो. ब्रँचच्या जवळच तिथल्या ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या गेस्ट हाऊसमधे उतरलो होतो. माझ्या सवयीप्रमाणे सकाळी चहा पिण्यासाठी म्हणून बाहेर पडलो. बरोबर रात्री धुवून वाळलेले कपडे इस्त्रीला टाकण्यासाठी घेऊन निघालो. एका चहाच्या छोट्या टपरीवर चहा घेऊन, इस्त्रीचे दुकान शोधत निघालो. बाजारात फिरत असतांना इस्त्रीचे दुकान कुठे दिसते का बघत होतो. पण कुठे दिसेना म्हणून जवळच्या एका दुकानदाराकडे चौकशी केली. पण तो म्हणाला 'आगे जाओ'. पुढे आणखी एका दुकानदाराकडे 'इस्त्रीका दुकान किधर है' म्हणून चौकशी केली. तर उत्तर देण्याऐवजी तो माझ्याकडे पाहतच राहिला. मी त्याला पुन्हा तोच प्रश्न विचारला. मग मात्र म्हणाला, 'दिखनेमे तो आप शरीफ लगते हो, लेकिन सुबह-सुबह आपको 'इस्त्रीका' दुकान क्यौं चाहिये?' मला काही कळेना हा असे का विचारतोय. आणखी खुलासा करावा म्हणून त्याला माझ्या जवळचे धुतलेले कपडे दाखवले व इस्त्रीची हाताने खूण केली. मग तो म्हणाला 'तो ऐसा बोलो ना की आपको कपडे प्रेसिंग के लिये देने है' मी म्हणालो 'हां, जी'. त्यावर तो म्हणाला ''इधर 'इस्त्री' का मतलब (एका नाकपुडीवर बोट ठेवून म्हणाला) ये होता है'. मग मला उलगडा झाला की 'इस्त्रीका दुकान' म्हणजे काय ते आणि सकाळी सकाळी झालेली फजिती पाहून मनातल्या मनात खजील झालो.

**- रा.ना.लळिंगकर,** पुणे

भ्रमणध्वनी - ९८२२१०७९८८

***********************************

## SBI SCHEME FOR PAYMENT OF EX-GRATIA LUMP SUM AMOUNT.

### One time window for submission of application. Extension of date up to 31st Dec 2011.

Bank has issued Circular Nos. CDO/ P&HRD-PM/37/2011-12 dated 7th July 2011, and CDO/P&HRD-PM/65/2011-12 dated 12th sept 2011 in respect of above. Now Bank has decided to give one time opportunity to the applicant dependants of deceased employees whose application is declined or not entertained on account of late submission. They can now apply afresh up to 31st Dec 2011 for this. Those who could not apply so far can also apply now. This facility is available to the cases of death after 4-11-2004. It will not be available to the cases considered and declined on penury norms.

Concerned Branch Managers are required to advise the scheme to and send the application forms to the dependants and extend all help in this regard. The cases of dependants in tems of scheme prevalent in these banks at the time of death of the employees.

The Branch representatives and members of Pensioners' Association can contact such dependants and help them to settle their claim.

**नेत्रदान, देहदान, रक्तदान-श्रेष्ठदान**

अधिक माहितीसाठी व फॉर्मसाठी कृपया संपर्क साधा.

* अनिल खाडीलकर *

दूरध्वनी - ९८५०९८४०४५, भ्रमणध्वनी - २५४४०८५१

# ग्रेट भेट - सदाबहार अशोककुमारची

अष्टपैलू कलावंत, अभिनेता, आदरणीय अशोककुमार उर्फ दादामुनी ह्यांची जन्मशताब्दी दि. १३ ऑक्टोबर २०११ रोजी झाली. आजच्या झगमगत्या रुपेरी सिनेसृष्टीतही 'अशोक' कालीन चंदेरी सृष्टीची आठवण माझ्याप्रमाणे अनेक ज्येष्ठ व जाणत्या रसिक प्रेक्षक व श्रोत्यांना आजही होत असेल ही खात्री आहे. शिवाय अशोककुमार हे उत्तम चित्रकार, बॉक्सर, होमिओपथीचे डॉक्टर तसेच 'चेतना' चे संचालक होते. माझ्या वडिलांना (कै. द. ना. बोकील) आचार्य अत्रे व अशोककुमार ह्यांच्या विलोभनीय कामगिरीबद्दल अत्यंत आदर व प्रेम होते आणि हाच वडिलोपार्जित वारसा मी पण पुढे बालपणापासून आनंदाने चालविला आहे.

साधारणपणे १९५१ ते १९७५ पर्यंत अशोककुमारांचे अनेक सरस चित्रपट मी पाहिले. त्यात महल, बंधन, किस्मत, हावडा ब्रिज, कानून, गुमराह, आरती, भाई भाई इ. किती नावे सांगावीत! अशोककुमारांच्या किस्मत चित्रपटाने तर सतत ३ वर्षे कोलकत्याच्या रॉक्सी चित्रपटगृहात ठाण मांडून एक विक्रमच केला होता ह्याची आठवण अनेक रसिकांना नक्कीच असेल.

दिवसेंदिवस माझा अशोककुमारांवरील आदरभाव वाढत असताना आपण आयुष्यात एकदा तरी आपल्या आवडत्या अभिनेत्याला भेटायचेच असा निश्चय मी केला होता. तेव्हा नेहमीप्रमाणे अनेक समस्या समोर उभ्या राहिल्याच, पण तीव्र इच्छेपुढे कोणालाही मार्ग सापडतोच असे म्हणतात त्याचा प्रत्यय मला आला म्हणूनच हा पत्रप्रपंच.

अकरा वर्षांपूर्वीचा १३ ऑक्टोबर २००० हा दिवस माझ्या जीवनात संस्मरणीय ठरला कारण नेरूळ येथे भारतीय स्टेट बँकेच्या सेवेत असताना ह्याच दिवशी मी युनियन पार्क, चेंबूर येथे अशोककुमारांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी, पुष्पगुच्छ, मिठाई इ. घेऊन मुद्दाम गेलो होतो. तत्पूर्वी हा 'शुभमुहूर्त' गाठण्यासाठी आधी भरपूर फोनाफोनी केली होती परंतु कोठेच समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने सायंकाळी थेट त्यांच्या बंगल्यावरच जाऊन धडकायचे असा निर्धार केला आणि अंमलात आणला. दारातच त्यांच्या पर्सनल सेक्रेटरींनी माझी उलटतपासणी घेऊन माझ्या अशोककुमारांवरील भक्तीची, आदराची पुरेपूर खात्री करून घेतली अन् मगच आढेवेढे घेऊन बंगल्याच्या आवारात घेतले. आत गेल्याबरोबर प्रथम स्वागत केले ते अशोककुमारांच्या आवडत्या धिप्पाड काळ्या कुत्र्याने! खरं तर तेव्हा मी प्रथम टरकलोच पण निम्मी लढाई जिंकल्याचे समाधान होते म्हणून त्याचे विशेष वाटले नाही.

सेक्रेटरीच्या विनंतीवरून मी पहिल्या मजल्याच्या दिवाणखान्यात बसलो होतो. तेव्हा माझी नजर ह्या थोर कलावंताच्या रसिकाग्रणी कृती/वृत्तीवर भिरभिरत होती. सुंदर पेंटिंग्ज, पत्नी शोभा गांगुली, बंधू किशोरकुमार ह्यांच्या तसबिरी, एक मोठ्या वाघाचे चितारलेले चित्र तल्लीन होऊन पाहत असताना 'वर' येण्याचा सेक्रेटरींनी वरूनच आदेश दिला. तेव्हा मला जिना चढताना थोडे धडधडायला लागले हे खरे. साक्षात वाघ, सिंहाच्या गुहेत आपण जातोय ही जाणीव होऊ लागली. भारतीय कीर्तीच्या एवढ्या मोठ्या कलावंतापुढे, नव्हे, आपल्या दैवतापुढे काय, कसे व किती बोलायचे हेच सुचत नव्हते.

दुसऱ्या मजल्यावरील हॉलच्या दारात पादत्राणे काढतानाच, 'अंदर आओ, चलेगा, चलेगा' हे वाक्य उच्चारणाऱ्या व्यक्तीकडे पाहत असताना मी ओळखलं, हेच ते अशोककुमार उर्फ दादामुनी! नंतर मी त्यांच्या शेजारी जाऊन बसलो. प्राथमिक बोलणे झाले. अशोककुमारांना अस्थमाचा त्रास होता हे मी समोर असलेल्या, त्यांच्या खास पलंगाशेजारील ऑक्सिजनच्या सिलेंडरवरून ओळखले. दादामुनींना ह्या वयात बोलण्याचा फार त्रास न देता त्यांना शुभेच्छा, पुष्पगुच्छ व मिठाईचा पुडा दिला आणि नमस्कार करून मी निघालो. जाता जाता ह्या दुर्मिळ प्रसंगाची स्मृती सदैव राहावी म्हणून दादामुनींना त्यांची स्वाक्षरी माझ्या डायरीत करण्याची हळूच विनंती केली आणि त्यांनीही ती लगेच मान्य केली. आता त्यांची 'अशोककुमार' ही इंग्रजी स्वाक्षरी मी अगदी मर्मबंधातल्या ठेवीप्रमाणे जपून ठेवली आहे. खरं तर हा सोहळा कॅमेऱ्यात बंद करण्याच्या तयारीने मी गेलो होतो पण नेमक्या त्याचवेळी कॅमेऱ्याने असहकार पुकारला तेव्हा मी खूप निराश झालो. मात्र परत निघताना अशोककुमारना 'श्यामची आई' ला पहिले राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले तेव्हा त्या सत्कार सोहळ्यात केलेल्या आचार्य अत्र्यांच्या भाषणाची आठवण मी आवर्जून करून दिली. आचार्य अत्रे ह्यांनी ह्या प्रसंगी मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र, आईची महती श्रोत्यांना ऐकवली होती. ते भाषण ऐकून अशोककुमार अत्र्यांना म्हणाले होते, 'ह्या भाषणासाठीही राष्ट्रपतींनी तुम्हाला वेगळे पारितोषिक द्यायला हवे.'

अनेक वर्षांची माझी मनोकामना अखेर अशी पूर्ण झाली आणि ह्या आनंदात मी दादामुनी व त्यांच्या युनियन पार्क परिसराचा निरोप घेतला.

- **सुहास बोकील**, पुणे
भ्रमणध्वनी - ९८९०८७०२१८

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

अरे बाळ, काय करायलास? तुझ्या हातात कुऱ्हाड?

''काय नाही, आबा, ही झाडं तोडणार आहे! रोज वैताग येतोय

नई, तर काय?'' असून अडचण, नसून खोळंबा, काय उपयोग आहे यांचा, कुण्या शाण्याने ही झाडं इथं मध्येच लावलीत!''

'अरे, थांब जरा- सांगतो. ऐक. जरा विचार कर. बाळा'! ही झाडं आपले जुने मित्र आहेत. या झाडांना जन्म तुझ्या पणजोबांनी दिला. आज यांचं वय-जन्म केव्हा झाला मलाच आठवत नाही!

ब्रह्मदेवाने घोर तपश्चर्या करून सृष्टी निर्माण केली. मानव जन्मला. मानवांच्या कल्याणासाठीच निसर्ग निर्माण झाला. घनदाट, निबिड अरण्य, हिरवीगार शेतं, डोंगर कडे कपारीमुळे मानवाच्या जीवनात आनंद निर्माण झाला. जगाच्या निर्मितीपासून परमेश्वराने निसर्गाला देवत्व बहाल करून पूजनीय ठरवलं. वृक्षांना धार्मिकतेची जोड दिली.

साक्षात भगवान अश्वस्थ रूप होते. भगवान शंकर पार्वतीने देवदार वृक्षास मानस पुत्र मानलं. कण्व ऋषींची कन्या शकुंतलाने आश्रमात असताना झाडावर बंधुतुल्य प्रेम केलं. म्हणूनच महर्षी कण्वांनी ती सासरी जाताना निरोप द्यायला वृक्षांना पाठवलं. श्रीकृष्णांनी म्हटलं आहे, 'अश्वत्थ: सर्व वृक्षांणां' मी सर्व वृक्षांत अश्वस्थ पिंपळ वास करतो. ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरी ग्रंथात म्हणतात, ''नगरेचि रचावी । जलाशये निर्मावी। महावने लावावीं नानाविधें।।

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचं झाडाझुडूपांवर फार माया होती. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' झाडं म्हणजे आपले नातेवाईक - असे ते सांगतात. समर्थ रामदास कायम वनात राहत. जगाचं रक्षण करणारी 'श्री शाकंभरी माता' तिलकवनात वास करते. मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामचंद्र वनवासात असताना सौंदर्य सृष्टीत रममाण व्हायचे. निसर्गरसज्ञ पर्णशय्येवर झोपत. चित्रकूट पर्वतावर निसर्गशोभा पाहून त्यांनी लक्ष्मणास आज्ञा केली,

''किती फुलांचे रंग गणावे । कुणा सुगंधा काय म्हणावे'

या इथे लक्ष्मणा बांधकुटी।।

छ. शिवाजी महाराजांच्या काळात वृक्षतोड दखल पात्र गुन्हा होता. अहिल्याबाई होळकर, सम्राट अशोक सारेच वृक्षप्रेमी होते.

डॉ.जगदीश बोस या शास्त्रज्ञाने वनस्पतींचा अभ्यास करून त्यांना जीव असतो हा सिद्धांत जगापुढे मांडला. एकूण ऐतिहासिक काळापासून जगाच्या किंवा भारतीयांच्या जीवनात वृक्षाना आदराचं स्थान आहे.

भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. कारण हिंदू संस्कृतीचे जीवन प्रतिबिंब प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सणात, उत्सवात उमटते. सणोत्सवामध्ये निसर्ग पूजन अभिप्रेत आहे. गुढीपाडवा हा आपला वर्षांतला पहिला सण त्या दिवशी सर्वच जण कडूलिंबाचा प्रसाद सेवन करतात. कडूलिंब म्हणजे कल्पवृक्ष आरोग्यरक्षक. हनुमान जयंतीला संजीवनी वनौषधींची आठवण येते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाची पूजा करतात. आषाढी-कार्तिकी एकादशीला वारकरी स्त्रिया डोक्यावर तुळशीवृंदावन घेतात. प्रदूषण कमी होते. गणेश चतुर्थीला शमी-दुर्वा अर्पण करतात. विजयादशमी (दसरा) ला शमीवृक्षाचे पूजन करून, आपट्याची पाने सोने म्हणून वाटतात. त्या दिवशी वृक्षांना सोन्याचे स्थान असते.

या निसर्गाशी मानवाचे नाते प्रेमाने, आत्मियतेच्या धाग्यादोऱ्यांनी विणलेलं असते. या नात्याची ओळख न कळणारी आहे. सुदैवाने भारताला हिरवाईचा खजिना लाभलेला आहे. वृक्ष आपले गुरू आहेत. मित्र माता-पिता आहेत. म्हणून झाडांचं निसर्गाचं मोल पैशात करता येत नाही. नैराश्य भीती या विचारांचं थैमान डोक्यात असतं. तेव्हा निसर्गच साथ करतो. सध्याच्या ग्लोबल वॉर्मिंगच्या शतकात झाडेच माणसांना साथ देतात. रणरणत्या उन्हात अनेक थकले भागले जीव झाडाखाली निवांतपणे झोपलेले असतात. हजारो जीव क्षणभर विसावतात. रणरणतं उन असो की जीवघेणा धुवाँधार पाऊस असो अनेक निराश्रीत माणसं झाडांच्या प्रेमाच्या सावलीत राहतात. अनेक माणसांनी तर आपले संसार थाटले. असंख्य भटक्या, गरीब, बेघर, कुटुंबांनी झाडांच्या सोबतच आनंदाने सुखाने जीवन घालवलं. झाडांच्या मातृप्रेमाच्या कुशीत हजारो चिमण्यांनी, पक्षांनी कुणी पारंब्यावर, कुणी ढोलीत, सुखाचा संसार केला. झाडं आपल्याला भरभरून देतात. पण त्यांना कसलीच अपेक्षा नसते. मा फलेषु कदाचन्

चैत्रात बहरणारा गुलमोहर. लाल लाल फुलांनी आच्छादलेला परिसर, फुलांच्या ओझ्यांनी वाकणाऱ्या फांद्या माणसापुढे किती नम्र होतात. कधी हिरवाईचा गालिचा, तर कधी गुलमोहरची लाल शाल. खरंच निसर्गाच्या जादूचा रंगच आगळा. डोळ्यांचे अक्षरश: पारणे फिटते. 'पानोपानी शुभ शकुनाच्या कोमल हिरव्या रेषा' पाहून मन धुंद होते. आजीबाईंचा बटवा म्हणजे पाना फुलांनी बनलेली वनौषधे 'घरचा वैद्य' बारीकसारीक आजार क्षणात गायब. मानवी जीवनात झाडांचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. झाडे अनेक वर्षे घट्ट पाय रोवून उभी असतात. ती स्थिर असतात. बोलता येत नाही. चालता येत नाही. अढळ स्थान. पानं गळतात, नवी नवी पालवी फुटते. झाडं माणसच लावतात, जपतात. वृक्ष विश्वासघातकी, कृतघ्न, भ्रष्टाचारी कधीच नसतात. आंब्याच्या झाडांवर तुम्ही कुऱ्हाडीचे घाव घातले तरी ती गोड गोड आंबेच देणार. झाडांशी एक भावनिक नाते असते. वृक्षांचं जीवनच भावस्पर्शी असते.

पर्यावरण रक्षण सर्वांचीच जबाबदारी आहे. प्रदूषणाला कोण, किती, कसे जबाबदार आहेत याचा सर्वांनीच अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. वृक्षवर्धन संकल्पना घराघरात पोहोचली पाहिजे. वैश्विक

तापमान वाढ रोखण्यासाठी आपले नातेवाईक मुले, भाऊ, मित्रमैत्रिणी, शेजारी यांना कृतिशील विचार करण्यास भाग पाडू या. हरित भारत आपलं कर्तव्य आहे. त्यासाठी झाडं लावली पाहिजेत.

स्वामी विवेकानंदांनी म्हटलं आहे, 'जी माणसं दहा वर्षांचा विचार करतात. ती झाडे लावतात. त्यांना जपतात.'

प्रत्येकाने एक वृक्ष लावून त्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले तर तो पुण्याईचा साधा सोपा मार्ग ठरेल. तो तुम्हाला वृद्धाश्रमाचा मार्ग दाखविणार नाही. उलट पानं फुलं आणि फळं देणारी झाडं शेवटी सरणासाठी सुद्धा जळतात. आपला अन्नदाता कृषिराजा (शेतकरी) म्हणतो, 'बाबांनो झाडं लावा बांधावर, पाऊस पडेल शेतावर.' समृद्ध वृक्षसंपदा म्हणजेच आपली संपत्ती. प्रगती.

हे सर्व ऐकून बाळ, बोलला, ''आबा, आज मला जागं आलेय! निसर्गाच्या जीवनात नवा इतिहास घडवेन. कुऱ्हाड मी फेकून दिलेय! मी वृक्षाचे वाढदिवस साजरा करणार! वाढदिवसाला झाडं भेट देणार!

- **अशोक शिवराम कुलकर्णी,** कोल्हापूर

## छप्पर फाडके

''देनेवाला जब भी देता । देता छप्पर फाडके.'' बाहेर गावी निघताना आपण आधी आपल्या वाहनात पुरेसे इंधन भरून मगच पुढे निघतो. आपले अ. नगर येथील सभासद श्री. भास्कर देशपांडे यांनी पुण्यास येण्यासाठी नगर येथे एच.पी. पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल भरले. त्यावेळी एच.पी. कंपनीची ''एच.पी. भरभरके जीतो'' ही ऑफर भारतभर चालू होती. याकाळात ८० लाख ग्राहकातून एकच ग्राहक भाग्यवान ठरला, ही लॉटरी श्री. भास्कर देशपांडे यांना लागली. त्यांना एच.पी. कंपनीने 'फियाट पिंटो' ही कार दिली. दि. ९ सप्टेंबर २०११ रोजी सन्मानाने मुंबई येथे, कंपनीच्या उच्च अधिकाऱ्याच्या हस्ते कारची चावी त्यांना सुपूर्द करण्यात आली.

श्री. देशपांडे यांचे हार्दिक अभिनंदन!

- **सेक्रेटरी**

## कृतज्ञता

सुहृद हो...

माझ्या पत्नीच्या दु:खद निधनानंतर माझ्यावर फार मोठी आर्थिक आपत्ती-संकट ओढवले. निवृत्तीनंतर मिळालेली सर्व पुंजी संपली तरीही कर्ज फिटले नाही. अशा माझ्या आपत्काली आपण सर्व मित्र धावून आलात. मी पार कोलमडून गेलेलो होतो. अशा माझ्या अवस्थेत तुम्ही सुहृदांनी मला समर्थ टेकू दिलात. मला सावरून धरले. खूप मोठ्ठा आधार दिलात. आपण सर्वजण माझ्या पाठीशी उभे राहून सक्रिय विश्वास दिलात. मी कृतज्ञ आहे. मी ऋणी आहे तुम्हा सर्वांचा!

मित्रहो, मध्यंतरी आपल्या सभासदांच्या सभेत कार्यकर्त्यांच्या बैठकीत आपण सर्वांनी एक संकल्पना चर्चेत आणली होती. कोणा सभासदांच्या आपत्काली त्याला सहाय्य करण्यासाठी एक कोष स्थापन करावा व त्या कोषामधून गरजू सभासदांना त्यांच्या कुवतीनुसार सुलभ हप्त्याने, परत फेडीच्या बोलीवर अर्थ सहाय्य (बिनव्याजी कर्ज म्हणून) देता यावे. अशी ती संकल्पना होती. ह्या कोष संकल्पनेचा आढावा घेऊन चर्चा घडावी असंही आपण ठरवत होतो.

मित्रहो! हा कोष अधिकृतरीत्या स्थापन होण्याआधीच आपण निधी संकलन करून मलाच पहिल्या लाभार्थीचा मान दिलात. मी तुमचा ऋणी आहे! कृतज्ञ आहे!

माझी गरज भागली आहे. आता परत फेडीची ऐपतही आली आहे. क्रमानुसार सर्व कर्ज फेड केल्यानंतर उरलेली रक्कम निधी म्हणा हवं तर, आपल्या स्थानिक संघटनेच्या सेव्हिंग्ज खात्यात (सर्वश्री सटवे, बेळे, गायकवाड यांचे ट्रेझरी शाखेतल्या संयुक्त खाते) जमा केली आहे. माझा खारीचा वाटा म्हणून (रू. १५०१/-) भर कृतज्ञापूर्वक घातली आहे.

आपला संकल्पित कोष लवकरात लवकर अधिकृतरित्या स्थापन होवो ही इच्छा. पुन:पुन्हा आभार म्हटल्याने हे ऋण फिटणार नाहीत याची जाणीव आहे. यास्तव आपल्या सर्वांबद्दल म्हणेन - ''ऐसी कळवळ्याची रीति- लाभावीण करि प्रिती।।

- **मधु रानडे,** नाशिक

## प्रतिक्रिया

'संवाद' २०११ सप्टेंबरचा अंक पाहण्यात आला. त्यात पृष्ठ क्र. २१ वर Symbols of Mints दिलेले आहे. त्यात Delhi Mint असे म्हटले आहे ते चूक आहे. Delhi Mint नसून Noida नॉयडा मिंट आहे. Symbol big dot ● पूर्वी तो मुंबई मिंटला होता पण छोटा होता • आता तो ◆ असा झाला आहे. इतर माहिती बरोबर आहे पण १९४७ साली ब्रिटीशांचा अखेरचा रुपया जो होता आणि ज्याला सिंबॉल नव्हता तो लाहोर मिंट म्हणून ओळखला जायचा.

- **पद्माकर शिरवाडकर,** ठाणे

# Grit, Guts and Gumption

***The above named book is written by Rajesh Chakrabarti recently published by Penguin books India. The book is reviewed by Dr. Brinda Jagirdar General Manager, Economic Research Dept. SBI which is published in "The India Banker" May 2011. We reproduce the same for our readers.***

Not many financial institutions in the world today can claim the lineage and the all pervading majestic presence of the State Bank of India. Tracing its roots to the the early 19th century, the bank has passed through several incarnations, all the while playing a pivotal role in shaping the country's economy. Over the years, the State Bank Group has assumed a multi-dimensional role in lending support to practically every sphere of economic activity and is truly, 'Banker to Every Indian'.

Very briefly, the three Presidency banks, namely Bank of Calcutta, which was later re-designated as the Bank of Bengal, Bank of Bombay and Bank of Madras were set up in 1806, 1840 and 1843 respectively. These were amalgamated in 1921 to form the Imperial Bank of India, which later became the State Bank of India on July 1, 1955.

While the bank's detailed history and its changing profile have been compiled separately running into several volumes, this book is a fascinating story of the bank's transformation in the last four years, and has been very ably penned by Prof Rajesh Chakrabarti in a first-of-a-kind narration with an offbeat title : Grit, Guts and Gumption. It has taken all of this to get back the bank's pre-eminence under the able leadership of its chairman O P Bhatt, who, as widely acknowledged, has been instrumental in State Bank of India regaining its market share, asserting its presence in the marketplace, gaining greater global visibility, expanding financial inclusion and foraying into new areas-all sustained at the root by a cultural transformation and mindset change.

Three facets of this transformation story stand out. One, the transformation was personally driven by chairman O P Bhatt and the top management with a sense of mission. Second, in all the initiatives there was a strong need to keep the customer at the centre and every change would ensure that transacting with the bank was a happy experience for the customer - new products, technology driven, streamlined processes, quicker turnaround, ambience. Third, but most important, the elephant learnt to dance because the staff across the length and breadth of the organisation were made to realise that it was time for them to change. Critical to this transformation agenda was a shared vision through Parivartan, Citizen SBI and Udaan.

As the book points out, awards have poured in, as recognition for the bank's achievements : increase in market share along with profitability, rise in fee income, leader in project finance, largest retail lender, fastest increase in international advances, undisputed leader, in agricultural loans, corporate, mid-corporate and SME segment, largest bancassurance player, largest ATMs and largest number of branches fully networked on core banking, customer orientation and change in employee mindset. All this is unparalleled achievement anywhere in the world in such a short span of time.

Clearly, one can say that SBI has truly found not just its way but also its 'swing'!

• • •

# मुबलक नाणी

सन १९८२-८३ मध्ये मी एका बऱ्यापैकी मोठ्या शाखेत कॅश ऑफीसर म्हणून कार्यरत होतो, त्या वेळचा हा प्रसंग आहे. त्या सुमारास नाणे टंचाई होती. गाव पण व्यापाराच्या दृष्टीने मोठे होते त्यामुळे ग्राहकांकडून नाण्यांची मागणी खूप असायची. त्या मानाने टांकसाळीतून होणारा पुरवठा अपुरा होता. शाखेतील स्थानिक सहकाऱ्यांमध्ये त्यामुळे आपापसात नेहमी वादावादी व्हायची. एखाद्या व्यापाऱ्याला नाण्यांची बॅग मिळाली नाही तर त्याच्या हितसंबंधात असलेला शाखेतील सहकाऱ्याचा अहंकार दुखावला जायचा. असेच एकदा दोन सहकाऱ्यांमध्ये वादावादी सुरू होती. तेवढ्यात सेव्हिंग्ज बँक काउंटरवर काम करणारा सहकारी मोठ्याने म्हणाला, ''अरे, काय कॉईन कॉईन करत बसलात? बेचाळीस नंबरचे लेजर जरा चाळा त्यात तुम्हाला भरपूर कॉईन सापडतील.''

बेचाळीस नंबरचे लेजर स्टाफ अकाउंटचे होते आणि त्यातील बऱ्याच खात्यांमध्ये फक्त पैशांमध्येच बॅलन्स होता. त्याने दाखविलेल्या समय सूचकतेमुळे व विनोदामुळे वादावादी करणारे पण गप्प झाले.

**- विजय वि. वैद्य**

# थरारक अनुभव

२००६ मध्ये माझ्या मुलीने २२ एप्रिलला कन्यारत्नास अमेरिकेत जन्म दिला. त्यानंतर ४ महिन्यांनी म्हणजे २२ ऑगस्टला मी, सौ. मुलगी व नात असे चौघे न्यूजर्सीहून भारतात यायला निघालो. विमानाने उड्डाण घेताना होणाऱ्या प्रचंड आवाजामुळे नात रडून रडून शेवटी थकून झोपली. ॲमस्टरडॅम पर्यंतचा प्रवास सुखकारक झाला. तेथून ४-५ तासाच्या अवधीनंतर पुढच्या मुंबईच्या प्रवासाला निघालो. तेव्हा ८-१० उशीरा आलेल्या प्रवाशांमुळे विमान १५ मिनिटे उशीरा सकाळी ११ वाजता सुटले.

विमान अर्धा पाऊण तासाने चांगल्याच उंचीवर गेल्यावर सुद्धा कंबरपट्टे सोडू देईनात. विमान सुटायच्या आधीपासून दोन साध्या वेषातील माणसे विमानभर फिरत होती. त्यामुळे मनात जरा शंकेची पाल चुकचुकली. दक्षता म्हणून काही जादा काळजी घेत असतील असे समजून गप्प बसून राहिलो. तोपर्यंत विमानातील खानपान सेवा पण सुरू झाली नव्हती. २-३ वेळेला विमान जोरात हलले. परंतु 'ढगांमुळे' असे कारण समजल्यावर पुन्हा गप्प झालो. तेवढ्यात एकदम घोषणा झाली की, ''काही तांत्रिक कारणांमुळे विमान परत ॲमस्टरडॅमला नेण्यात येत आहे.'' हे ऐकून काळजाचा ठोका चुकला व मनात असंख्य प्रश्न उभे राहिले.'' १) तांत्रिक कारण म्हणजे नक्की काय? २) ती साध्या वेषातील माणसे विमानभर का फिरत होती? विमान उतरताना आणि उतरल्यावर नक्की काय होणार? तेवढ्या अर्ध्या पाऊण तासात ती उशीरा आलेली माणसे बऱ्याच वेळा जागा बदलत होती, मोबाईल वापरत होती आणि मधून मधून त्यांची व त्या दोन माणसांची बाचाबाची होत होती. त्याचा अर्थ काय? असे अनेक प्रश्न!

त्यानंतर विमान टर्मिनल्सवर उभे केले नव्हते. कदाचित विमान हायजॅक झाले असेल असे सांगितले. ५-१० मिनिटांनी दार उघडताच २५-३० कमांडोज आत शिरले आणि मनात यक्ष प्रश्न उभा राहि**ला** की आता नक्की काय होणार? मनात ईश्वराचा धावा सुरू केला की, माझे काहीही झाले तरी चालेल पण ह्या तिघींना सुरक्षित ठेव! कमांडोज उशीरा आलेल्या सर्व प्रवाशांना बेड्या घालून घेऊन गेले.

विमान मधेच उभे केलेले असल्यामुळे आम्हाला एका बसमधून टर्मिनल्सवर नेण्यात आले आणि सांगण्यात आले की, ज्यांना घाईने भारतात जायचे असेल त्यांनी इतर विमानसेवांकडे चौकशी करावी व तिकिटे बदली करून घ्यावीत. इतरांना २४ तास येथे मुक्काम करावा लागेल कारण उद्या सकाळी ह्याच वेळेला विमान भारताकडे जायला निघेल. अशा प्रवाशांनी पोलिस व विमानतळ अधिकाऱ्यांकडून २४ तासांचा विसा करून घ्यावा, त्यांची हॉटेलमध्ये राहण्याची, खाण्यापिण्याची, फोनसाठी सगळी सोय केली जाईल. टी.व्ही.वर ही बातमी दाखवत असल्यामुळे ताबडतोब अमेरिकेत जावयांना व भारतात मुलीच्या सासुरवाडीला आमच्या सुरक्षिततेबद्दल फोन केले.

आम्हाला दुसरा पर्याय सोयीस्कर असल्यामुळे त्यानंतर सामान गोळा करणे, विसा मिळविणे, तिकिटे बदलून घेणे ह्या सगळ्या गोष्टी पूर्ण करून हॉटेलवर पोचण्यास ६.३० ते ७ वाजले. हॉटेलच्या बाहेरून आत जाण्यास चढ असल्यामुळे व हमालाची सोय नसल्यामुळे जी काही कसरत करावी लागली त्याचे वर्णन शब्दात करू शकत नाही.

रूममध्ये जाईपर्यंत नात आजीच्या मांडीवर किंवा कडेवर बसून अगदी उबून गेली होती. आत गेल्यावर तिला सर्व कपडे काढून मोकळे केल्यावर त्या चार महिन्याच्या जीवाच्या तोंडावरचा आनंद अवर्णनीय होता. पुन्हा एकदा दोन्हीकडे फोन केले. नंतर लवकरच जेवून थकल्यामुळे सगळे गाढ झोपी गेलो.

सकाळी लवकर उठून आवरून विमानतळावर पोचलो. सकाळी ८ वाजता बसची सोय केली होती. तिथेही नात बरोबर असल्यामुळे सगळीकडे लवकर नंबर लागला आणि आम्ही भारतात नव्हतो याचा खराखुरा आनंद झाला. नंतर सामान घेऊन १ल्या मजल्यावर जायला तिरकस सरकता पट्टा होता त्यावर पत्नी माझ्या पुढे ट्रॉली घेऊन होती, पत्नी जेमतेम शेवटपर्यंत पोचल्यावर पट्टा बंद बंद पडला. तिला २-४ लोकांनी ट्रॉलीसकट कसेबसे वर घेतले पण मी मात्र मध्यावर फोटो काढल्यासारखा अडकलो होतो मला ना धड खाली जाता येईना ना वर! त्यावेळेस लोकांच्या चेहऱ्यावरचे हावभाव व माझी मानसिक अवस्था ह्याचे वर्णन न केलेलेच बरे! नंतर १०-१२ मिनिटांनी पट्टा आमच्या नशिबाने सुरू झाला आणि आमची स्वारी कशीतरी वर जाऊन पोचली. तोपर्यंत वर असलेली पत्नी व खाली असलेली मुलगी (नातीसकट) हवालदिल झाल्या होत्या. मुलगी कस्टम अधिकाऱ्यांच्या मदतीने वर आली.

नंतरचा आमचा पुण्यापर्यंतचा प्रवास उत्तम झाला. दोन दिवसांनी कळले की ज्या सहप्रवाशांना अटक केली होती ते दहशतवादी तर नव्हतेच. पण ते व्यापारी असून वेस्टइंडिजला व्यापारी प्रदर्शनाला गेले होते. विमानात उशीरा आल्यानंतरच्या त्यांच्या संशयास्पद हालचाली त्यांना फारच महागात पडल्या. त्यांना भारत सरकारने सोडवून आणले. हे सर्व कळेपर्यंत प्रवासात ४ महिन्यात चार महिन्यांची नात बरोबर असल्यामुळे माझी अवस्था मन चिंती ते वैरी न चिंती अशीच झाली होती.

- **जयंत नारायण गोरे**, पुणे
भ्रमणध्वनी - ९९६०५६६८६०

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

# पुन:पुन्हा

पुन:पुन्हा होती ओले, दोन हे माझे डोळे ।
बाळ माझा परदेशी, दिवाळी ही अशी कशी? ।।

लेक गेली सासरी, तीही असे दूरदेशी ।
नातवांची सय सले, पुन:पुन्हा डोळे ओले ।।

गोडधोड सारे केले, सगेसोयरे येऊन भेटले ।
आठवण तरी उरी, जुन्या त्या दिवाळीची ।।

इवलेसे हात धरती, पेटलेली ती फुलबाजी ।
हात भाजला म्हणूनी, फुंकर घाली ताईबाई ।।

तबक छोट्याशा हाती, भाऊबीज ओवाळणी ।
आज न घडे इथे काही, म्हणूनी डोळा येई पाणी ।।

रांगोळीचे रंग सारे, फिके पडती अश्रूंमुळे ।
अडके घास ओठी अन्, पुन:पुन्हा डोळे ओले।।

- **कल्पना सुभाष कोठारे**, सांताक्रुझ
फोन नं.: २६१०४५५२

# प्रतिक्रिया

दिवाळी विशेषांक हातात पडला आणि वाचायला घेतला.

मुखपृष्ठावरील पालकर यांचे व्यंगचित्राने आपल्या सगळ्यांच्या मनातील भावनाच व्यक्त केल्या.

क्रांतीसेन आठवल्यांचे संपादकीय अगदी समर्पक.

वसंत धुपकरांच्या 'भैरवी'चे सम्राट शंकर-जयकिशन ह्या लेखामुळे जुन्या सुपरहिट गाण्यांच्या आठवणी चाळवल्या आणि तरुणपण आठवले.

प्रभाकर गुपचूप यांच्या 'तू तेव्हा तशी' ह्या लेखाने आमच्या त्यावेळच्या डेक्कन जिमखाना शाखेच्या वातावरणाची आठवण झाली.

शरद शिंगवेकरांनी नेहमीप्रमाणे त्यांच्या 'भयमुक्त व्हा, निर्भय बना' ह्या लेखातून 'सकारात्मक दृष्टिकोन' यावर भर दिला. शशिकांत लावणीस यांचा 'श्रीमंत मी' हा लेख तसेच एस. व्ही. नाईकांचा Bringing up new Generation हा लेख वाचनीय आहे.

- **अनिल खाडिलकर**, पुणे
भ्रमणध्वनी - ९८५०९८४०४५

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.